**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शफीमोहमंद अब्दुलकरीम शेख — अपीलकर्ता
३१, माची पेठ, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. शफीमोहमंद अब्दुलकरीम शेख
३१, माची पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
डॉ. वाय. एच. डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा — मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
श्री. सूर्यकांत एकनाथ कांडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वैद्यकीय अधिकारी डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांना सेवेतून कमी करण्याच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती असंबध्द व दिशाभूल करणारी आहे. योग्य माहिती अद्याप देण्यात आलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शफीमोहमंद अब्दुलकरीम शेख यांनी केले.

श्री. शेख यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. तसेच याच विषयाच्याअनुषंगाने डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांनी माहिती मागणीसाठी केलेला अर्ज व श्री. शेख यांनी केलेला अर्ज यातील मुद्दे व हस्ताक्षर सारखेच आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीला तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'लाही श्री. शेख उपस्थित नव्हते, तर डॉ. पाटील यांनीच बाजू मांडली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ श्री. सूर्यकांत एकनाथ कांडेकर यांनी केले. श्री. शेख यांनी केलेला अर्ज व अन्य निवेदने यातील स्वाक्षरीमध्ये तफावत असल्याचे जन माहिती अधिकारी श्री. कांडेकर यांनी निदर्शनास आणले. श्री. शेख स्वाक्षरीबाबत पुराव्यानिशी स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

डॉ. पाटील यांचे विविध अर्ज व अपिले या अनुषंगाने त्यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अभिलेखाचा शोध घेणे, सर्व संचिका डॉ. पाटील यांना उपलब्ध करून देणे आदीबाबतची पूर्तता करण्यात आली आहे. असे असताना त्याच विषयावर त्याच मागणीसाठी अन्य व्यक्तीने अर्ज व अपील करणे व त्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. पाटील यांनी स्वत: उपस्थित राहणे, ही कार्यपध्दती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उचित वापर करणारी नाही, याची समज अपीलकर्ता श्री. शेख व डॉ. दिलीप मल्हारराव पाटील यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबासाहेब विश्वनाथ भंडारी — अपीलकर्ता
५०६, गुरुवार पेठ, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. बाबासाहेब विश्वनाथ भंडारी, ५०६, गुरुवार पेठ, सातारा<br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग, सातारा श्री. सोपान महादेव जमदाडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि. २२.१०.२००१ रोजी आपल्याला औंध पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघात होऊन उजवा हात निकामी झाला, त्याबाबत संबंधित मोटार चालकाच्या विरूध्द आपण दिलेल्या जबाबाच्या नकला आपल्याला दिल्या जात नाहीत. पोलिसांनी न्यायालयात जबाब दाखल केला नाही व आपल्या विरूध्दच

गुन्हा दाखल केला. जबाब घेतलेले असतानाही जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, सातारा हे जबाब घेतले नसल्याचे कळवितात, यावरून पोलीस कागदपत्र दडवीत असल्याचे स्पष्ट होते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बाबासाहेब विश्वनाथ भंडारी यांनी केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी नमूद केले.

श्री. भंडारी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा जबाब पोलिसांनी घेतला असल्याचे त्यांनी दिलेल्या तपशिलावरून स्पष्ट होते. त्यामुळे संबंधित जबाबाची प्रत त्यांना दिली गेली पाहिजे. आवक-जावक बारनिशीतील नोंदी तपासून पंधरा दिवसांत शोध घेऊन जबाबाची नक्कल अपीलकर्त्यांस पुरवावी. ती प्राप्त न झाल्यास कागदपत्रांच्या वर्गवारीनुसार कार्यवाही न करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांविरूध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा. संबंधित जबाब न्यायालयास दाखल केला असल्यास न्यायालयातून त्याची प्रत घेऊन अपीलकर्त्यास ती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि त्यानुसार पूर्तता न झाल्याची व वारंवार मागणी करूनही माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याची तक्रार श्री. भंडारी यांनी केली. त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग, सातारा श्री. सोपान महादेव जमदाडे यांना आयोगाने दि. २५.११.२००९ रोजी दूरध्वनीद्वारे विचारणा केली. त्यानंतर दि. २७.११.२००९ च्या पत्रान्वये श्री. जमदाडे यांनी आयोगाला अहवाल सादर केला.

औंध पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. घनवट, तत्कालीन सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री. सवाखंडे व पोलीस हवालदार ब.नं.१९ नलवडे यांनी औंध पोलीस ठाणे गु.र.नं.२५/२००२ मधील कागदपत्रे सहमतीने गहाळ केली म्हणून संबंधित व्यक्तीवर फौजदारी गुन्हा /शिस्तभंगाची कारवाई करणेपूर्वी खातेनिहाय चौकशी करणे आवश्यक असल्यामुळे, तिन्ही व्यक्तींविरूध्द प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी कॅम्प, वडूज यांना इकडील आदेश क्र.पशा.१/मा.अधि/४०७/सातारा/२००९ दिनांक २६.११.२००९ अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत, असे श्री. सदानंद वायसे पाटील यांनी या अहवालात नमूद केले आहे.

दि. ५.२.२००९ रोजी सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशानुसार विहित मुदतीत अहवाल व कार्यवाही श्री. जमदाडे यांनी केलेली नाही. संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे स्मरण दि. २५.११.२००९ रोजी आयोगाने दिल्यानंतर दि. २६.११.२००९ रोजी तशा कार्यवाहीचे आदेश दिल्याचे

त्यांच्या अहवालावरून स्पष्ट होते. ही बाब गंभीर आहे. या दिरंगाईबाबत, तसेच संबंधित जबाबाच्या प्रती शोधण्याबाबत केलेल्या प्रयत्नांचा खुलासा उपरोक्त कागदपत्रांसह त्यांनी त्वरित करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार विहित मुदतीत कार्यवाही न करणे व अहवाल सादर न करणे ही गंभीर बाब असून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग, सातारा श्री. सोपान महादेव जमदाडे यांनी त्याबाबतचा खुलासा दि. ३०.१२.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा. अनुपालन अहवाल न केल्याबद्दलच्या कार्यवाहीबाबतचा निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संपतराव लक्ष्मण सावंत
फिनिक्स, ५३/अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.स.या.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सु.रा.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.५.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यात झालेल्या बदलाबाबत सन १९९८ पासून वारंवार दिशाभूल करणारी माहिती दिली आणि शेवटी मूळ कागदपत्रात बदल केला. याबाबत हस्ताक्षर तज्ज्ञाकडून तपासणी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संपतराव लक्ष्मण सावंत यांनी केली.

सन १९७० व १९७२ पासून मूळ कागदपत्रात असलेल्या नोंदींची प्रमाणित माहिती देण्यात आली. यात कोणताही बदल अथवा खाडाखोड करण्याचा प्रश्न येत नाही, अपीलकर्त्यास सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध आहेत. संबंधित जमिनीच्या हद्दीबाबतचा वाद असून अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा यांच्याकडे हे प्रकरण दाखल आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सु.रा.पाटील यानी केले.

संबंधित नोंदीमध्ये करण्यात आलेले बदल अधिकृत की अनधिकृत हा विषय, तसेच हस्ताक्षरतज्ज्ञाकडून त्याबाबतची तपासणी करण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक तर त्याबाबत स्वतंत्र न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुण खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश पांडुरंग जाधव
जुना समडोळी रोड, अमर महाराष्ट्र चौक,
मु.पो.सांगलीवाडी, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी,
फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे (अ.क्र.४११+४१२) — उत्तरवादी

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, चिंतामणराव व्यापार महाविद्यालय,
सांगली मिरज रोड, विश्रामबाग, ता.मिरज, जि.सांगली (अ.क्र.४८८)

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहा.सचिव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी,
फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे

(२)**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
चिंतामणराव व्यापार महाविद्यालय,
सांगली मिरज रोड, विश्रामबाग, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४११+४१२+४८८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.४.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश पांडुरंग जाधव

जुना समडोळी रोड, अमर महाराष्ट्र चौक, मु.पो.सांगलीवाडी, ता.मिरज, जि.सांगली

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी,

फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे (अ.क्र.४११+४१२) श्री.अजीत वासुदेव पटवर्धन

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहा.सचिव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी,

फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे श्री.श्रीकृष्ण नीळकंठ कानेटकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००६ व २७.३.२००७<br>दि.११.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.३.२००७ व २४.५.२००७<br>दि.३१.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१०.२००७, दि.७.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२९.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांची नावे व नेमणुकीच्या वेळची त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता यांची माहिती वारंवार मागूनही डेक्कन एज्युकेशन सोसायटी देत नाही. माहिती देण्याबाबत शिक्षण संचालनालयाने व पुणे विद्यापीठाने सूचना देऊनही संस्था जाणीवपूर्वक माहिती देत नाही, कारण अपात्र व्यक्तीची नेमणूक केलेली आहे, त्याची नेमणूक रद्द करून शासनाने अदा केलेल्या पगाराची रक्कम संबंधित व्यक्तीकडून वसूल करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश पांडुरंग जाधव यांनी केली.

श्री.जाधव संस्थेच्या चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, विश्रामबाग, सांगली येथे लिपिक पदावर कार्यरत होते. संस्थेने आपल्याला कमी केले. कामगार न्यायालयाने दाखल केलेल्या दाव्याचा निकाल आपल्या बाजूने लागूनही संस्थेने आपल्याला पुन्हा नोकरीत घेतलेले नाही. संस्थेने आपल्याविरूध्द सांगलीच्या औद्योगिक न्यायालयात दावा दाखल आहे. आपल्याला कमी करून पात्र नसलेल्या उमेदवारांची नेमणूक पैसे घेऊन व वशिल्याने केली आहे, असे श्री.जाधव यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री.जाधव यांच्या संदर्भात शिक्षण संचालनालयाने पाठविलेल्या पत्रांना वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत. श्री.जाधव व संस्था यांच्यामध्ये न्यायालयात परस्परविरूध्द दावे असल्यामुळे व श्री.जाधव विविध पातळ्यांवर संस्थेविरूध्द खोटेनाटे अर्ज व आरोप करीत असल्यामुळे त्याबाबत संस्था वेगळी कारवाई करणार आहे. संबंधित माहिती त्यांना देण्यात आली आहे. शिक्षण सहसंचालक यांनी संस्थेची तपासणी करून कोणतीही अनियमितता आढळली नसल्याचे नमूद केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे श्री.श्रीकृष्ण नीळकंठ कानेटकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता मूळ प्रकरण व्यक्तिगत वादाच्या स्वरूपाचे असून अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एम.व्ही.चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर
वितद्यमान-श्री.आर.एच.चव्हाण, तत्कालीन-श्री.बी.एस.कोपार्डेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीलाही गैरहजर होते.

पंचायत समिती, आजरा यांच्याकडे ग्रामसेवक असलेले श्री.अप्पासाहेब रामचंद्र जाधव यांचे मूळ सेवापुस्तक आदि माहिती हेतूपुरस्सर दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.परशराम बंडू पाटील यांनी केली. श्री.जाधव सन १९५३ ते १९७२ अखेर तलाठी व ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. त्यांचे मूळ सेवापुस्तक उपलबध नाही. तसेच राजीनाम्याची मूळ प्रत आदि कागदपत्रे उपलब्ध नाहीत. उपलब्ध असलेली सर्व माहिती विहित मुदतीत दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर (विद्यमान) श्री.आर.एच.चव्हाण व (तत्कालीन) श्री.बी.एस.कोपार्डेकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्व संबंधित ठिकाणी शोध घेण्यात आला. तथापि श्री.पाटील यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती देत आहोत, मूळ कागदपत्रे नाहीत. दुबार सेवापुस्तक तयार करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सन १९८६ मध्ये दिलेले आहेत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एम.व्ही.चौगुले यांनी केले.

कागदपत्रांच्या वर्गवारीप्रमाणे जतनाच्या कालावधीनुसार तपासणी करून अहवाल आयेगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन

माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.आर.एच.चव्हाण यांनी दि.६.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. ग्रामसेवक श्री.अप्पासाहेब रामचंद्र जाधव यांचा राजीनामा दि.३०.१२.१९६८ पासून मंजूर झाला आहे. अभिलेखाच्या वर्गीकरणानुसार सेवापुस्तक ब वर्गात येत असून त्याचा जतनाचा कालावधी तीस वर्षे आहे, असे या अहवाला नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हरिश्चंद्र शिवदास सोनवणे
११अ, नम्रतानगर हौसिंग सोसायटी, नडगिरी पेट्रोलपंपासमोर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरिश्चंद्र शिवदास सोनवणे
११अ, नम्रतानगर हौसिंग सोसायटी, नडगिरी पेट्रोलपंपासमोर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सोलापूर विद्यमान-प्रतिनिधी-श्री.डी.बी.देशपांडे
तत्कालीन-श्री.पी.व्ही.ठाकरे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सोलापूर विद्यमान-कु.व्ही.टी.बोराडे, तत्कालीन-श्री.जयकुमार राज

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मुद्रांक रजिस्टरची नक्कल आपण जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उत्तर सोलापूर-१, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. परंतु संबंधित रजिस्टर कार्यालयात नसून प्राप्त होताच माहिती देण्यात येईल, असे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिले. काही कर्मचाऱ्यांनी संगनमताने संबंधित रजिस्टर गहाळ केल्याने हवी ती नक्कल आपल्याला मिळाली नाही. कार्यालयाच्या अभिलेखातून कागदपत्रे गहाळ होणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाईस पात्र आहे. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उत्तर सोलापूर-१, जि.सोलापूर यांनी १५ दिवसात अपीलकर्त्यास माहिती द्यावी, अन्यथा सदर अभिलेखाच्या जतनाशी संबंधित असणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना खातेनिहाय चौकशीस सामोरे जावे लागेल, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर श्री.पी.व्ही.ठाकरे यांनी दिले. एका व्यक्तीने यातील मुद्रांकावर आपल्या वडिलांचे मृत्यूपत्र करून घेतलेले असून आपली सर्व मालमत्ता घेतलेली आहे, त्यामुळे ही माहिती आपल्याला मिळणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.हरिश्चंद्र शिवदास सोनवणे यांनी केले.

सन २००० मधील हा विषय असून मुद्रांक विक्रेता श्री.रमेश संभाजी गंगणे यांच्याकडून एप्रिल २००० मध्ये झालेल्या मुद्रांक विक्रीच्या संदर्भातील माहिती श्री.सोनवणे यांनी मागितली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जयकुमार राज यांनी व त्यानंतर आपणही कसून शोध घेऊनही हे रजिस्टर प्राप्त झाले नाही. तत्कालीन उपनिबंधक यांनाही याबाबत कळविले व त्यांनीही सखोल चौकशी करून संबंधितांचे जाबजबाब घेतले. तथापि रजिस्टर मिळाले नाही, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उत्तर सोलापूर-१, जि.सोलापूर कु.व्ही.टी.बोराडे यांनी केले. संबंधित चौकशीचा संपूर्ण तपशील संबंधितांच्या जाबजबाबांच्या प्रतींसह त्यांनी सादर केला. अशा प्रकारची शेकडो रजिस्टर्स असून ती अद्यापही नष्ट केलेली नाहीत. संबंधितांचे जाबजबाब आपण घेतले असता श्री.गंगणे यांना संबंधित रजिस्टर दिल्याचे सांगण्यात आले. तथापि तशी कागदोपत्री पोहोच नाही, असे प्रतिपादन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर श्री.पी.व्ही.ठाकरे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत पूर्तता झालेली नाही, ती होणे आवश्यक आहे. संपूर्ण अभिलेखाचा कसून शोध घेऊन संबंधितांच्या खुलाशासह एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करावा. तसेच संबंधित अभिलेख न आढळल्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित रजिस्टर शोधण्याबाबत संबंधितांच्या जाबजबाबासह केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सह जिल्हा निबंधक यांनी दि.२४.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. तथापि आधी केलेल्या निवेदनाव्यतिरिक्त कोणतीही अधिक माहिती त्यात नाही. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर (सध्या नोंदणी उपमहानिरीक्षक, नागपूर) श्री.पी.व्ही.ठाकरे यांनी दि.२७ व २८.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला. 'अपिलीय अधिकारी या नात्याने योग्य चौकशी करून

अंतिम आदेश पारित केला. परंतु आदेशात नमूद केल्यानुसार अभिलेखाच्या जतनाशी संबंधित असणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना खातेनिहाय चौकशीस सामोरे जावे लागेल, असे नमूद केलेले होते. त्यानुसार सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर उचित कार्यवाही करणे गरजेचे होते. परंतु कार्यालयीन कामाच्या व्यापामुळे व दरम्यानच्या काळातच माझे पदोन्नतीची कार्यवाही चालू असल्यामुळे माझे कार्यवाही करण्याच्या कामाकडे थोडे दुर्लक्ष झालेले आहे, त्याबद्दल मला क्षमा करावी. इतर कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, ही विनंती. मात्र विद्यमान सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांनी दि.२३.३.२००७ च्या आदेशातील कार्यवाहीप्रमाणे अभिलेखातील जतनाच्या संबंधित सर्व तत्कालीन कर्मचारी/अधिकारी श्री.जे.एस.राज(तत्कालीन) दुय्यम निबंधक, श्री.एम.एस.शेख, श्री.बी.के.खांडेकर, श्री.एम.एम.नाईक, श्री.एस.बी.रेवजे, श्री.एस.बी.कोळकुरे, कु.व्ही.टी.बोराडे व मुद्रांक विक्रेता श्री.गंगणे व त्या कार्यालयातील शिपाई श्री.गणेश कांबळे यांच्यावर कारवाईच्या दि.२४.११.२००८ च्या पत्रान्वये नोटिसेस दिलेल्या आहेत. दि.४.९.२००८ पासून मी नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर विभाग, नागपूर या पदावर नागपूर येथे कार्यरत असल्याने उपरोक्त आदेशानुसार पुढील कार्यालयीन कार्यवाही संबंधित सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर हे करतील,' असे या अहवालात नमूद केले आहे. या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत आपल्याला माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सोनवणे यांनी दि.४.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उत्तर सोलापूर-१, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांच्याकडून या संदर्भात दि.१३.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाने खुलासा मागविला. अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांनी दि.१७.३.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला असून श्री.ए.बी.कंदले, दुय्यम निबंधक वर्ग-२, उत्तर सोलापूर-१, श्री.गणेश तुळशिराम कांबळे, शिपाई व श्री.रमेश संभाजी गंगणे, शहर मुद्रांक विक्रेता व दस्तलेखनिक, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्याबाबत सह जिल्हा निबंधक (वर्ग-२), सोलापूर उत्तर-१ यांना आदेश देऊन प्राधिकृत करण्यात आले व त्यांनी दि.२२.१२.२००८

रोजी सदरबझार पोलीस चौकी, सोलापूर येथे गुन्हा नोंदविल्याची प्रत सादर केली. या गुन्ह्याच्या तपासाबाबत झालेल्या पुढील कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) सह जिल्हा निबंधक(वर्ग-२), सोलापूर उत्तर-१ यांनी विषयांकित प्रकरणी नोंदविलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, उत्तर सोलापूर-१, जि.सोलापूर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हा विभाग, सदरबझार पोलीस चौकी, सोलापूर यांनी दि.३०.१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

प्रत:: वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हा विभाग, सदरबझार पोलीस चौकी, सोलापूर यांना योग्य त्या कारवाईसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.जनार्दन जिजाबा मोटे
रा.दापोडी, पो.बोरीवली, ता.दौंड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री.जनार्दन जिजाबा मोटे<br>रा.दापोडी, पो.बोरीवली, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रशांत शांताराम आवटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.डी.डी.काळे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.०५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.१०.२००६ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जागेवरील अतिक्रमण कायम केलेल्या नकलांची मागणी करुनही २ वर्षे आपल्याला मिळालेली नाही. संबंधित संचिका कार्यालयात दाखल नसल्याचे तहसीलदार कार्यालयातून आपल्याला समजले. दापोडीचे गाव कामगार तलाठी, ग्रामसेवक व विकास सोसायटीचे सचिव यांना तहसीलदारांनी नोटीस काढल्यानंतर संचिका कार्यालयात जमा होऊन आपल्याला नक्कल मिळाली. संचिका गायब करणाऱ्यांवर काय कारवाई केली, अशी माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.डी.डी.काळे यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली व दिशाभूल करणारी माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रशांत शांताराम आवटे यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जनार्दन जिजाबा मोटे यांनी घेतली.

हा विषय सन २००२ मधील आहे. श्री.मोटे तेव्हापासून या कागदपत्रांबाबत पत्रव्यवहार करीत आहेत. संबंधित प्रकरण पंचायत समितीकडे पाठविण्यात आले होते. गट विकास अधिकाऱ्यांनी संचिका प्रकरणी जबाबदार असणारे ग्रामसेवक, दापोडी श्री.डी.एम.खोमणे यांची एक वेतनवाढ एक वर्षाकरिता बंद करण्यात आल्याचे कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.डी.डी.काळे यांनी नमूद केले. मात्र श्री.खोमणे यांच्यावरील कारवाई मूळ जागा कमी असताना ज्यादा कामाची नोंद घेतल्याबाबत केलेली असून संचिका जमा करण्याच्या प्रकरणाशी त्याचा संबंध नाही, असे प्रतिपादन श्री.मोटे यांनी केले.

शासकीय कागदपत्रे असलेली संचिका कार्यालयात दाखल न करण्याबाबत श्री.खोमणे यांच्यावर कारवाई करण्यात आली की अतिक्रमण प्रकरणातील कसुरीबद्दल करण्यात आली, याचा खुलासा संबंधित गट विकास अधिकारी श्री.राजेंद्र पोकरे यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रशांत शांताराम आवटे यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी दिले. आपल्या

कार्यालयाकडून दि.१४.०१.२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दौंड यांना पत्र देऊन संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे सूचित केले आहे. गट विकास अधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच अपीलकर्त्यास अवगत करण्यात येईल. असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रशांत शांताराम आवटे यांनी आयोगाच्या विचारणेनंतर दि.२०.०१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती दौंड यांनी अहवाल त्वरीत सादर करुन त्यानुसार तहसीलदार दौंड तहसील कार्यालय, ता.दौंड, जि.पुणे यांनी दि.३०.१२.२००९ पर्यंत अहवाल सादर न केल्यास दोन्ही अधिकारी कारवाईस प्राप्त ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत : मान्य.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती दौंड व तहसीलदार, दौंड यांनी विषयांकित प्रकरणाबाबत अनुपालन अहवाल दि.२५.१२.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दिनांक : ११/१२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरूण तुकाराम पाटील
मु.पो.मलतवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, सरसेनापती प्रतापराव गुर्जर
शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती महाविद्यालय,
महागाव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरूण तुकाराम पाटील
मु.पो.मलतवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, सरसेनापती प्रतापराव गुर्जर
शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर डॉ.निवास बापूसाहेब जाधव

**जना माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती महाविद्यालय,
महागाव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नारायण रामभाऊ पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एकाच विषयाबाबत तीन अपिले आपण केली आहेत. शुल्क भरूनही आपल्याला माहिती दिली नाही. सेवापुस्तकाची पूर्तता केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अरूण तुकाराम पाटील यांनी केली.

श्री.पाटील विविध स्वरूपाचे अर्ज करीत असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. सेवापुस्तकातील बाबींच्या संदर्भात आवश्यक ती पूर्तता त्यांनीच केलेली नसल्यामुळे ती कागदपत्रे अपूर्ण आहेत. त्यामुळे ती माहिती देता आलेली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नारायण रामभाऊ पाटील यानी केले. अन्य व्यक्तींच्या गोपनीय अहवालाच्या प्रती आदि स्वरूपाची माहिती श्री.पाटील मागतात व त्याचा संस्थेविरूध्दच्या प्रचारासाठी दुरूपयोग करतात, असे प्रतिपादन अन्य अपिलांमध्ये आपण केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याने स्वतः पूर्तता न केलेल्या कागदपत्रांची माहिती मागणे योग्य नाही. या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नारायण रामभाऊ पाटील

यांनी दि.२.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला असून श्री.पाटील यांना अपूर्ण असलेल्या कागदपत्रांच्या प्रती व सर्व माहिती आयोगापुढील सुनावणीपूर्वीच नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आल्या. अपुऱ्या कागदपत्रांबाबत श्री.पाटील यांनी दि.१.१.२००९ च्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाने कळविले आहे. परंतु त्यांनी संपर्क साधला नाही व सह्यांची अद्याप पूर्तता केलेली नाही. त्यांनी सह्यांची पूर्तता केल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात महाविद्यालयाला कोणतीही अडचण नाही, असे श्री.नारायण रामभाऊ पाटील यांनी या अहवालात संबंधित पत्रांच्या प्रतींसह नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास जनार्दन जाधव
८३७१/८२, रेल्वेलाईन, फॉरेस्ट, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी आपली मागणी संदिग्ध स्वरूपाची असल्याचे नमूद करून अर्ज निकाली काढला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विश्वास जनार्दन जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर आपल्याला दिलेली माहिती अपुरी आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.जाधव यांनी केले.

श्री.जाधव यांनी सुमारे २७ वर्षांच्या काळातील व ज्याचा अर्थ लावून माहितीचा शोध घ्यावा लागेल, अशा स्वरूपात माहितीची मागणी केली आहे. नेमकेपणाने मागणी केल्यास माहिती देता येईल, असे त्यांना लेखी व तोंडी कळविण्यात आले असून 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांनी केलेल्या मागणीनुसार माहिती दिलेली आहे. माहिती देऊ केली असता घेण्यास नकार दिला. विशिष्ट शिक्षकांबाबतची माहिती त्यांना अपेक्षित असून त्याबाबतचा तपशील देण्यास तयारी नाही. तो तपशील दिल्यास संपूर्ण माहिती त्वरित देण्यात येईल, असे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एस.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एम.एन.वीर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधीर माधव जोशी — अपीलकर्ता
बिल्डिंग क्र.२, फ्लॅट क्र.१५, ५८७, दत्तप्रसाद
सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे-३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** पुणे नवरात्री उत्सव ट्रस्ट, पर्वती, पुणे-९ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** पुणे नवरात्री उत्सव ट्रस्ट, पर्वती, पुणे-९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.११.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे नवरात्रौ महोत्सव ट्रस्ट यांच्या हिशोबाची कागदपत्रे ट्रस्टकडून व धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडून दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री. जोशी यांच्या पत्राला दहा दिवसांतच उत्तर देण्यात आले. पुणे नवरात्रौ महोत्सव ट्रस्टच्या संदर्भात धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडील चौकशी कामकाजाचे प्रकरण प्रलंबित आहे. लेखा परीक्षकांनी हिशेबपत्र दाखल केलेले आहे, तसेच आणखी काही हिशोबाची कागदपत्रे दाखल करण्याचे

काम चालू असून धर्मादाय आयुक्तांकडे ती दाखल झाल्यानंतर अपीलकर्ता तेथून प्राप्त करून घेऊ शकतात,असे लेखी निवेदन ट्रस्टचे अध्यक्ष श्री. उल्हास ऊर्फ आबा वसंत बागुल यांनी आयोगाला सादर केले.

संबंधित ट्रस्ट माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सार्वजनिक प्राधिकरण ठरत असल्याचा कोणताही पुरावा अपीलकर्ता श्री. जोशी यांनी सादर केलेला नाही. ते लक्षात घेता अपील दाखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ